दूरध्वनी: २५४५३४९०

ठाणे महानगरपालिका, ठाणे.
महानगरपालिका भवन डॉ. अल्मेडा रोड, पांचपाखाडी, ठाणे - ४०० ६०२
THE MUNCIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

संदर्भ क्र. मुख्या-१/उ.व.वृ.प्रा.वि-२३-७५

दिनांक: २५/१०/२०२०

**महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम, १९७५ चे कलम ८ (३) नुसार वृक्ष तोडणे/ वृक्ष पुनर्रोपणासाठी परवानगी**

THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE
ठाणे महानगरपालिका

प्रति,
मे. साकार (वा.वि.),
२ रा मजला, नक्षत्र, विंग ए,
टिएमसी जवळ, अल्मेडा रोड,
पांचपाखाडी, ठाणे (प.)

विषय: विकास प्रस्ताव क्र. एस०२/०२१७/१८, सेक्टर - २, सी.टी.एस. नं. १५, ४७, ४८, ४९, ५९ व ६३, टिका नं. १८, दमाणी इस्टेट, मौजे नौपाडा, ठाणे (प.) येथील इमारतीच्या व पोडियमच्या बांधकामात बाधित ४० वृक्ष पुनर्रोपण व ०१ वृक्ष तोडणेबाबत.

संदर्भ:
१. मे. साकार वा.वि. यांचा आ.क्र १३०० दि. ११/११/२०१९ रोजीचा अर्ज.
२. दि. २७/११/२०१९ रोजीचे प्रपत्र - सी नुसार अर्ज व प्रपत्र - डी नुसार हमीपत्र.
३. **मा. वृक्षप्राधिकरण ठराव क्र. ११ दि. ११/०९/२०२० अन्वये प्राप्त मान्यता.**
४. जा.क्र. मुख्या-१/उ.व.वृ.प्रा.वि-२३-४९३ दि.२४/०९/२०२० रोजीचे सुरक्षा अनामत रक्कम व वृक्षनिधी भरणा पत्र.
५. ठामपा/उवि/वृप्रा./आ.क्र. ११२८ दि. १/१०/२०२० अन्वये पावती क्र.TMC/HQ/TRA/००००७१/२०-२१ दि.१/१०/२०२० व पावती क्र.TMC/HQ/TRA/००००७२/२०-२१ दि.१/१०/२०२० रोजीचे सुरक्षा अनामत रक्कम भरणा पत्र.
६. ठामपा/उवि/वृप्रा./आ.क्र. ११७२ दि. ८/१०/२०२० अन्वये पावती क्र.TMC/HQ/TRA/००००७७/२०-२१ दि.७/१०/२०२० नुसार वृक्षनिधी भरणा व रोपे उपलब्धतेचे पत्र.

ज्याअर्थी, संदर्भ क्र. १ व २ च्या अनुषंगाने वर नमूद विषयाबाबत महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ नुसार विकास कामामध्ये बाधित होत असलेल्या वृक्षांबाबत परिपूर्ण प्रशासकीय व तांत्रिक अहवालासह प्रकरण प्राप्त झालेले होते.

ज्याअर्थी, प्रस्तुत प्रकरणी सादर केलेल्या अहवालानुसार संदर्भ क्र. ३ च्या अनुषंगाने **मा. वृक्षप्राधिकरण ठराव क्र. ११ दि. ११/०९/२०२०** अन्वये पुढीलप्रमाणे कार्यवाही करणेस निर्णय झालेला आहे.

| | **महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम, १९७५ चे कलम ८ (३) अन्वये निर्णय** | |
|---|---|---|
| अ | इमारतीच्या व पोडियमच्या बांधकामात बाधित होणारे एकूण <u>४१</u> वृक्षांपैकी (०३ सोनचाफा, ०७ अशोका, ०३ पिंपळ, ०९ गुलमोहर, ०२ फणस, ०४ टॅबेबुवा, ०८ बदाम, ०१ नारळ, ०१ उंबर, ०२ पाम) <u>४०</u> वृक्ष पुनर्रोपण करणे. | |
| अ ३ | १:५ प्रमाणे वृक्षारोपण प्रजाती व संख्या | स्थानिक प्रजातीचे २०० वृक्षरोपण करणे. |
| अ ४ | नव्याने १ वृक्ष रोपण करण्याप्रित्यर्थ रु.५,०००/- प्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम जमा करणे. | एकूण <u>२००</u> वृक्ष रोपण व जतन करणे प्रित्यर्थ रक्कम रु. **१०,००,०००/- (अक्षरी रु. दहा लक्ष मात्र)** सुरक्षा अनामत जमा करणे. |
| ब | इमारतीच्या व पोडियमच्या बांधकामात बाधित होणारे एकूण <u>४१</u> वृक्षांपैकी ०१ ताड वृक्ष पुनर्रोपण करण्यास तांत्रिकदृष्ट्या अयोग्य असल्याने **०१ वृक्ष तोडणे.** | |
| ब २ | १:५ प्रमाणे वृक्षारोपण प्रजाती व संख्या | स्थानिक प्रजातीचे ०५ वृक्षरोपण करणे. |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| ब ३ | नव्याने १ वृक्ष रोपण करण्याप्रित्यर्थ रु.५,०००/- प्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम जमा करणे. | एकूण ०५ वृक्ष रोपण व जतन करणे प्रित्यर्थ रक्कम रु. २५,०००/- **(अक्षरी रु. पंचवीस हजार मात्र)** सुरक्षा अनामत रक्कम जमा करणे. |
| ब ४ | १:१० प्रमाणे वृक्षारोपण प्रजाती व संख्या | स्थानिक प्रजातींचे किमान ८ ते १० फूट उंचीचे वृक्ष स्वतःच्या मालकीच्या जागेवर लागवड करणे. एकूण **१०** वृक्ष रोपण करणे. |
| ब ४ i | मात्र वृक्षारोपणासाठी जागा नसेल तर किमान ८ ते १० फूट उंचीचे स्थानिक प्रजातीचे वृक्ष रोपे वृक्षप्राधिकरणाकडे उपलब्ध करुन देणे व आणून दिलेल्या वृक्षरोपांचे जतन करण्याप्रित्यर्थ ना परतावा वृक्षनिधी रक्कम रु. १०००/- आगाऊ जमा करुन घेणे. | एकूण **१०** वृक्ष रोपे वृक्षप्राधिकरणाकडे उपलब्ध करुन देणे, व रु. **१०,०००/-(अक्षरी रु. दहा हजार मात्र)** वृक्षनिधी रक्कम जमा करणे. |

ज्याअर्थी, **संदर्भ क्र. ०४** च्या अनुषंगाने वर नमूद केल्यानुसार अ.क्र. अ ४, ब ३ प्रमाणे **संदर्भ क्र.५** नुसार एकूण सुरक्षा अनामत रक्कम रु. **१०,२५,०००/- (अक्षरी रु. दहा लक्ष पंचवीस हजार मात्र)** भरणा करण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी, **संदर्भ क्र. ०४** च्या अनुषंगाने वर नमूद केल्यानुसार अ.क्र. ब ४ i प्रमाणे **संदर्भ क्र.६** नुसार एकूण **वृक्षनिधी** रक्कम रु. **१०,०००/-(अक्षरी रु. दहा हजार मात्र)** भरणा करण्यात आलेली आहे व **१०** वृक्ष रोपे वृक्षप्राधिकरणाकडे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

सबब, सदर प्रकरणी महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम, १९७५ नुसार विकास प्रस्ताव क्र. एस०२/०२१७/१८, सेक्टर - २, सी.टी.एस. नं. १५, ४७, ४८, ४९, ५९ व ६३, टिका नं. १८, दमाणी इस्टेट, मौजे नौपाडा, ठाणे (प.) येथील इमारतीच्या व पोडियमच्या बांधकामात बाधित ४० वृक्ष पुनर्रोपण व ०१ वृक्ष तोडणे यास पुढील नमूद अटींस अधिन राहून परवानगी देण्यात येत आहे.

१. अधिनियमातील कलम ८ (६) नुसार परवानगी देण्यात आल्यानंतर १५ दिवसापर्यंत कोणतेही झाड तोडण्यात येणार नाही.

२. अधिनियमातील कलम ८ (५) नुसार या परवानगी पत्राच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत योग्य त्या स्थानिक जातीचे वृक्षारोपण करणे.

३. कोविड -१९ (कोरोना वायरस) विषाणूचा संसर्ग / प्रादुर्भाव टाळण्यासाठी केंद्र शासन व राज्य शासनामार्फत दक्षता घेण्याकरीता प्रतिबंधक उपाययोजना लागू केल्या आहेत. त्यानुसार वृक्षांची छाटणी करणे/ वृक्ष तोडणे / पुनर्रोपण करतेवेळी नियुक्त मनुष्यबळामार्फत मास्क, हातमोजे (Hand gloves), सॅनिटाईजर, डिसीफेक्टंट इ. चा वापर करणे बंधनकारक आहे. या उपाययोजनांचे उल्लंघन झाल्यास त्यासाठी अर्जदार पूर्णपणे जबाबदार राहिल.

४. वृक्षांच्या छाटण्यात आलेल्या फांद्या / हरित कचरा स्वःखर्चाने कोपरी मलःनिस्सारण केंद्र येथील प्रकल्प येथे टाकणे, सदर फांद्या रस्त्यालगत अथवा जवळील कचरा पेटीवर टाकण्यात येणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार यांची राहील व असे केल्यास स्वच्छ भारत अभियान व कोविड-१९ (कोरोना वायरस) विषाणू संसर्ग / प्रादूर्भाव प्रतिबंधक कायदयानुसार कठोर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

५. अधिनियमातील कलम ११ (२) नुसार या पुढील ३ वर्षासाठी नित्यनेमाने वृक्ष जतन केल्याबाबत दर सहामाही लेखी अहवाल सादर करणे.

६. अधिनियमातील कलम ८ व ९ च्या आदेशाचे उल्लंघन झाल्यास वृक्ष संवर्धनाबाबत जमा सुरक्षा अनामत रक्कम रु. **१०,२५,०००/- (अक्षरी रु. दहा लक्ष पंचवीस हजार मात्र)** जप्त होईल व मालक / भोगवटादार **श्री. कपिल महेंन्द्र शर्मा पत्ता:- प्रॉविडन्स रिअल्टी एल.एल.पी. तर्फे भागीदार दमाणी इस्टेट, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे** यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

(अलका खैरे) १/१२/२०

सहाय्यक आयुक्त तथा वृक्षअधिकारी
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**प्रत :** माहितीसाठी सविनय सादर.
१. अति. आयुक्त सो. (१) (वृक्षप्राधिकरण)
२. मा. उप आयुक्त सो. (वृक्षप्राधिकरण)

Scanned with CamScanner